मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# चिंचवड मतदार संघात मतदान यंत्रांची द्वितीय सरमिसळ संपन्न

## सरमिसळ प्रक्रिया संगणकीय प्रणालीच्या माध्यमातून संपन्न झाली : निवडणूक निर्णय अधिकारी अनिल पवार यांनी माहिती दिली

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिंचवड विधानसभा मतदारसंघात २१ उमेदवार निवडणूकीसाठी रिंगणात असून ५६४ मतदान केंद्रांसाठी आवश्यक असणाऱ्या मतदान यंत्रांची द्वितीय सरमिसळ प्रक्रिया संगणकीय प्रणालीच्या माध्यमातून संपन्न झाली असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी अनिल पवार यांनी दिली आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ग क्षेत्रीय कार्यालयाच्या बापुजी बुवा सभागृह, थेरगाव येथे पार पडलेल्या द्वितीय सरमिसळ प्रक्रियेवेळी निवडणूक निरीक्षक मनवेश सिंग सिद्धू, चिंचवड



विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी अनिल पवार, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी अमोल कदम, आशा होळकर, किशोर ननवरे यांच्यासह संबधित कक्षाचे समन्वय अधिकारी आणि उमेदवार तसेच त्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

यावेळी अनिल पवार यांनी चिंचवड विधानसभा मतदारसंघातील निवडणुकीसाठी रिंगणात असलेले उमेदवार आणि त्यांच्या प्रतिनिधींना सरमिसळ प्रक्रीयेची माहिती दिली. निवडणूक निरीक्षक मनवेश सिंग सिद्धू यांनी उपस्थित उमेदवार आणि त्यांच्या प्रतिनिधीना आवश्यक मार्गदर्शक सूचना दिल्या.

चिंचवड विधानसभा मतदारसंघासाठी १ हजार ३५३ बॅलेट युनिट, ६७६ कंट्रोल युनिट आणि ७३३ व्हीव्हीपॅट मशीन जिल्हाधिकारी कार्यालयाकडून उपलब्ध झाले आहेत. त्यांची द्वितीय सरमिसळ प्रक्रिया (रँडमायझेशन) संगणकीय प्रणालीच्या माध्यमातून करण्यात आली. चिंचवड विधानसभा मतदारसंघामध्ये एकूण ५६४ मतदान केंद्र आहेत. या मतदारसंघात २१ उमेदवार निवडणूकीसाठी रिंगणात असून त्यासाठी आवश्यक असणाऱ्या ५६४ मतदान केंद्रांसाठी प्रत्येकी २ बॅलेट युनिट, १ कंट्रोल युनिट व १ व्हीव्हीपॅट यंत्रे वाटप करण्यात आली असून २२५ बॅलेट युनिट, ११२ कंट्रोल युनिट आणि १६९ व्हीव्हीपॅट यंत्रे राखीव ठेवण्यात आली आहेत, अशी माहितीही अनिल पवार यांनी दिली.

## प्रभाग निहाय जनसंपर्क कार्यालय उभारणार...

### अण्णा बनसोडे यांच्या प्रचार फेरीला कासारवाडीत उदंड प्रतिसाद...



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी विधानसभा मतदार संघातील राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीचे उमेदवार आमदार अण्णा बनसोडे यांच्या प्रचारार्थ शुक्रवारी कासारवाडी भागात भव्य प्रचार फेरी काढण्यात आली. या प्रचारफेरीस नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद लाभला. मतदार संघातील लोकांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी प्रभाग निहाय जनसंपर्क कार्यालय उभारण्याची घोषणा यावेळी आमदार अण्णा बनसोडे यांनी केली.

कासारवाडी येथील सूर्यमुखी महादेव मंदिराचे दर्शन घेऊन प्रचार फेरी सुरुवात करण्यात आली. या प्रचार फेरीत माजी महापौर व राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष योगेश बहल, माजी नगरसेवक श्याम लांडे, माऊली थोरात, स्वाती उर्फ माई काटे, किरण मोटे, उल्हास शेट्टी, राष्ट्रवादी युवती काँग्रेसच्या वर्षा जगताप, आरपीआयचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब भागवत, कष्टकरी कामगार नेते बाबा कांबळे, संजय अवसरमल, अ‍ॅड. आतिष लांडगे, अ‍ॅड. संजय दातीर पाटील, कुणाल लांडगे, बाळासाहेब लांडे, प्रकाश तात्या जवळकर, रघुनाथ जवळकर, प्रतिभा जवळकर, रवींद्र ओव्हाळ, शेखर कुटे, शेखर काटे, सीमा बोरसे, अमोल मोटे, सतीश लांडगे, बाळासाहेब रोकडे, तुकाराम बजबळकर, कुमार कांबळे, सुप्रिया काटे, सुनिता अडसुळे, महेश झपके आदींसह कासारवाडी परिसरातील महायुती घटक पक्षाचे प्रमुख कार्यकर्ते, पदाधिकारी सहभागी झाले होते.

सूर्यमुखी महादेव मंदिराचे दर्शन घेऊन कासारवाडी येथे प्रचारफेरी सुरुवात झाली तेथून शास्त्रीनगर जवळकर कॉलनी, गुलिस्तान नगर, हिराबाई झोपडपट्टी, जय महाराष्ट्र चौक, ज्ञानेश्वर कॉलनी, पिंपळे सदन, नाशिक फाटा मार्गाने जाऊन गोयल रेसिडेन्सी येथे प्रचार फेरीचा समारोप करण्यात आला. या प्रचारफेरीस नागरिकांचा उदंड प्रतिसाद लाभला. ठिकठिकाणी महिला भगिनींनी औक्षण करून अण्णा बनसोडे यांना शुभेच्छा दिल्या. या भेटीत बनसोडे यांनी ज्येष्ठ नागरिक, नव मतदार, यांच्याशी संपर्क साधला. तरुण वर्गाचा मोठा पाठिंबा अण्णा बनसोडे यांना असल्याचे या रॅलीत दिसून आले.

## आयुक्त बंगल्यासमोरून धावणार 'बीआरटी'

### बीआरटी मार्ग रखडलेला होता,आता जागेचा तिढा सुटला



**पिंपरी | प्रतिनिधी**

गेल्या चौदा वर्षापासून ६०० मीटर लांब जागेच्या भूसंपादनाअभावी काळेवाडी फाटा ते देहू-आळंदी रस्ता (चिखली) बीआरटी मार्ग रखडलेला होता. आता जागेचा तिढा सुटला असून, त्या जागेवरील बांधकाम पाडण्यात आले आहे, लवकरच रस्त्याची निर्मिती होऊन त्या ठिकाणारून बीआरटी बससेवा सुरू होईल.

पिंपरी-चिंचवड महापालिकेने बस रॅपिड ट्रान्झिट सिस्टिम (बीआरटीएस) प्रकल्प उभारले आहेत. त्यात निगडी-दापोडी, औंध- सांगवी फाटा- रावेत- किवळे, नाशिक फाटा-वाकड, दिघी-आळंदी, काळेवाडी फाटा ते देहू-आळंदी रस्ता (चिखली) आणि निगडीतील भक्ती-शक्ती चौक-मुकाई चौक किवळे या मार्गाचा समावेश आहे. भक्ती-शक्ती ते किवळे मार्ग तयार आहे. मात्र, बससेवा अद्याप सुरू झालेली नाही. अन्य मार्गांवर बससेवा सुरू आहे. काळेवाडी फाटा ते देहू-आळंदी रस्त्यावर आयुक्त बंगल्यासमोरील भूसंपादन रखडलेले होते. दोन कंपन्यांच्या इमारती होत्या. आता तो प्रश्न सुटला असून, इमारती हटविण्यात आल्या आहेत. त्यांचा राडारोडा हटविण्याचे काम शुक्रवारी (ता. ८) सुरू होते. पूर्णानगर चौकापासून देहू-आळंदी रस्त्यापर्यंत (चिखली) बीआरटी मार्ग नसून चारपदरी रस्ता आहे. आता आयुक्त बंगल्यासमोरील मार्ग झाल्यानंतर बीआरटी सेवा सुरू होईल. सद्यःस्थितीत केएसबी चौकापासून संघवी केसरी महाविद्यालय- मोहननगर कॉर्नर- ऑटो क्लस्टर कॉर्नर मार्गे पुन्हा बीआरटी मार्ग अशी बससेवा सुरू आहे. या मार्गाने चिखली-पिंपरी, चिखली-हिंजवडी, घरकूल-पिंपरी या बस धावत आहेत.

**असा आहे मार्ग**

- काळेवाडी फाटा ते चिखलीपर्यंत लांबी १०.२५ किलोमीटर
- रस्त्याची रुंदी सरासरी ४५ मीटर, मात्र कुदळवाडी ते चिखली दरम्यान २४ मीटर रुंद
- मार्गावर एकूण ११ बसथांबे
- एम्पायर इस्टेट व लिंक रस्ता थांबा उड्डाणपुलावर
- काळेवाडी, पिंपरी, चिंचवड, चिखली, मोशी, हिंजवडी, वाकड, चिंचवड स्टेशन भाग जोडला
- पदपथ १.८ मीटर, तर सायकल ट्रॅक २.५ मीटर रुंद
- मार्गावरी संत मदर तेरेसा उड्डाणपुलाची लांबी १.६ मीटर

## मोशीत छठ महापूजा मोठ्या थाटामाटात साजरी

### काशी गंगा आरती पाहण्यासाठी मोशी घाटावर मोठी गर्दी झाली होती.



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहरातील इंद्रायणी व पवना नद्यांच्या २० घाटांवर आज छठ महापूजा मोठ्या थाटामाटात साजरी करण्यात आली. छठवर्ती माता-भगिनींनी आपल्या लाडक्या सूर्यनारायणाला शुद्ध जल अर्पण करून जगाच्या आणि कुटुंबाच्या कल्याणासाठी प्रार्थना केली. काशी गंगा आरती पाहण्यासाठी मोशी घाटावर मोठी गर्दी झाली होती.

काशीहून आलेल्या कृष्ण महाराज आणि त्यांच्या टीमने गंगा आरती केली. सामुहिक छठ पूजा एकूण १५१ छठ वेदांसह झाली, ज्याने स्वतःमध्ये एक विक्रम केला. विश्व श्री राम सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ लालबाबू गुप्ता यांच्या वतीने गेल्या अनेक वर्षापासून मोशी घाटावर छठ पूजेचे आयोजन करण्यात येते. पालिका व पोलीस प्रशासनाचे विशेष सहकार्य लाभले. उद्या पहाटे उगवत्या सूर्यदेवाला 'अर्ध्या' अर्पण करून ३६ तासांच्या या कठीण उपवासाची सांगता होईल.

हे मान्यवर उपस्थित होते..

विश्व श्रीराम सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.लालबाबू गुप्ता, योगी निरंजनदास महाराज, कार्तिक लांडगे, माजी शिक्षक सुरेश पांडे आदी उपस्थित होते. लाइफ गार्ड, रुग्णवाहिका, ३ बोटी आणि पोलीस सुरक्षा दल, अग्निशामक दल, सर्वत्र तैनात होते. ड्रोन कॅमेऱ्यांद्वारे पाळत ठेवण्यात आली होती.

छटपूजेची श्रद्धा, नशीब आणि आरोग्याचा आशीर्वादप्रत्यक्ष देवता भगवान सूर्य आणि छठी मैया यांच्या विशेष उपासनेशी संबंधित हा पवित्र सण बिहार, उत्तर प्रदेश, झारखंड आणि देशाच्या इतर भागांमध्ये मोठ्या थाटामाटात साजरा केला जातो. सनातन परंपरेत, भगवान सूर्य आणि छठी मातेचे व्रत मोठ्या नियमाने आणि संयमाने पाळले जाते. असे मानले जाते की जो व्यक्ती हे व्रत कर्मकांडानुसार पाळतो, त्याच्या सर्व मनोकामना निश्चितपणे छठीमैय्याने पूर्ण होतात. छठ व्रत विशेषत: सौभाग्य आणि आरोग्याचे वरदान देणाऱ्या सूर्यदेवाला अर्घ्य अर्पण करण्याची परंपरा आहे.

# ‘अभय प्रभावना’ संग्रहालयाचे उद्घाटन नितीन गडकरी यांच्या हस्ते

## जैन तत्त्वज्ञान आणि भारतीय वारसा यांना समर्पित असलेल्या ‘अभय प्रभावना’ या संग्रहालयाचे उद्घाटन करण्यात आले.

**पुणे | प्रतिनिधी**

जैन तत्त्वज्ञान आणि भारतीय वारसा यांना समर्पित असलेल्या ‘अभय प्रभावना’ या संग्रहालयाचे केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते मंगळवारी (ता. ५) उद्घाटन करण्यात आले. ५० एकर जागेत ३.५ लाख चौरस फूट बांधकाम असलेले हे संग्रहालय मावळ तालुक्यात इंद्रायणी नदीच्या निसर्गरम्य काठावर पारवडी येथे उभारण्यात आले आहे.

जैन मूल्यांची सखोल समज निर्माण करणे, भारतीय मूल्य प्रणालीवर आणि समकालीन समाजात जैन मूल्यांची प्रासंगिकता यावर आधारित असणाऱ्या या संग्रहालयाची स्थापना ‘अमर प्रेरणा ट्रस्ट’चे अध्यक्ष अभय फिरोदिया यांनी केली आहे. उद्घाटन समारंभास पद्मश्री गुरुदेवश्री राकेशजी (धरमपूर), पद्मश्री आचार्य चंदना जी महाराज (वीरायतन), दलाई लामा यांचे प्रतिनिधित्व करणारे परमपूज्य सीलिंग टोंगखोर रिनपोचे, केंद्रीय दळणवळण आणि पूर्वोत्तर क्षेत्र विकास मंत्री ज्योतिरादित्य सिंदिया, ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे, हेग येथील आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे न्यायमूर्ती दलवीर भंडारी, मेवाडचे महाराज कुमार लक्ष्यराज सिंह, केंद्र सरकारच्या पर्यावरण आणि वन राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) मनेका गांधी आणि पद्मभूषण डी. आर. मेहता उपस्थित होते.



### असे आहे संग्रहालय

» अभय प्रभावना संग्रहालय हे अभ्यागतांना जैन धर्माच्या शिकवणींद्वारे भारतीय मूल्यांबद्दल माहिती देण्यासाठी उभारण्यात आले आहे. या संग्रहालयात ३५० पेक्षा अधिक अद्वितीय कलाकृतींसह ३० विशेषतः डिझाइन केलेल्या गॅलरी आहेत. ज्यातून सामाजिक स्तरावर सुरक्षा, उत्पादकता, समृद्धी आणि वैयक्तिक स्तरावर करुणा, मुक्त विचारसरणी आणि नैतिक जीवन या जैन मूल्यांवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. ५० एकर जागेवर पसरलेले हे संग्रहालय अद्ययावत ऑडिओ-व्हिज्युअल्स, ॲनिमेशन, व्हर्च्युअल रिॲलिटी आणि परस्परसंवाद प्रणालीने समृद्ध आहे. जैन तत्त्वज्ञानातील आध्यात्मिक संकल्पना सोप्या पद्धतीने समजावून सांगण्यासाठी ३५० हून अधिक कलाकृती, शिल्पे आणि भव्य प्रतिकृती येथे तयार केल्या आहेत. या संग्रहालयात ३५ प्रोजेक्टर, ६७५ ऑडिओ स्पीकर्स आहेत.

> अन्न, वस्त्र आणि निवारा आहे म्हणून सर्व छान होत नाही. आदर्श समाजासाठी संस्कार देखील आवश्यक आहेत. भारतीय संस्कृतीमध्ये जीवन मूल्ये आहेत. जगात ज्या समस्या आहेत त्या आपण पाहतो. प्रगती, संपन्नता आणि विकास देखील समस्या घेऊन येतात. त्यामुळे या सर्वांसोबत मूल्याधिष्ठित जीवनपद्धती हवी, तरच जीवन सुखी होईल. भावी पिढीला प्रेरणा देण्यासाठी ‘अभय प्रभावना’च्या माध्यमातून चांगल्या उपक्रमाची उभारणी करण्यात आला. हे केवळ संग्रहालय नाही तर प्रेरणादायी स्थान असून ते ज्ञान केंद्र ठरेल. फिरोदिया यांनी केलेले काम पुढील अनेक पिढ्यांना प्रेरणादायी राहील.
>
> - नितीन गडकरी, केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री.

> ‘अभय प्रभावना’ हे श्रमण आणि जैन परंपरेच्या सखोल मूल्यांचे सन्मान करणारे संग्रहालय आहे. या मूल्यांचा प्रभाव हा हजारो वर्षांपासून देशाच्या नैतिक आणि सांस्कृतिक गाभ्यात आहे. हे संग्रहालय शिक्षण, व्यावसायिकता आणि नीतिमत्तेच्या तत्त्वांचा प्रचार करत केवळ संकल्पना म्हणून नव्हे तर सामाजिक मूल्य म्हणून प्रतिबिंबित करते. हे व्यक्तींना संतुलित आणि उद्देशपूर्ण जीवनासाठी मार्गदर्शन करेल. आम्हाला आशा आहे की, संग्रहालय लोकांना जैन धर्माद्वारे व्यक्त केलेल्या भारतीय सभ्यतेच्या आदर्श दहा मूल्यांचा शोध घेण्यास आणि त्यांच्याशी जोडण्यासाठी प्रेरणा देईल.
>
> - अभय फिरोदिया, अध्यक्ष, अमर प्रेरणा ट्रस्ट..

# भाजपच्या स्टार प्रचारकांकडून जनतेच्या पैशांची उधळपट्टी..

## सर्वोच्च न्यायलयाने थेट हस्तक्षेप करावा; शिवसेनेच्या संतोष सौंदणकरांची मागणी...

**पिंपरी | प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीतील स्टार प्रचारक म्हणवणारे भाजपचे पंतप्रधान, केंद्रीय मंत्री यासह विविध राज्यांचे मुख्यमंत्री, मंत्री महोदय यांचा सरकारी तिजोरीवर डल्ला मारण्याचा उद्योग सुरु आहे. पक्षाच्या प्रचारासाठी येतात आणि खर्च मात्र, शासकीय यंत्रणांच्या माथी मारण्याचा पराक्रम यांच्याकडून होत आहे. त्यामुळे राज्याच्या तिजोरीवर याचा अधिकचा भार पडत असून महाराष्ट्र कर्जबाजारी होत आहे. राज्याची जनता या भ्रष्ट नीती जोपासणाऱ्या भाजप सरकारचा यंदाच्या विधानसभा निवडणुकीत बुरखा फाडल्याशिवाय राहणार नाही, असा घणाघात शिवसेना चिंचवड विधानसभेचे शहर संघटक संतोष सौंदणकर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे सत्ताधारी भाजपवर केला आहे.

पत्रकात त्यांनी म्हटले आहे की, महाराष्ट्र राज्याची विधानसभा निवडणूक शिगेला पोहोचली आहे. सत्ताधारी राजकीय पक्षांसह विरोधी पक्षांचे स्टार प्रचारक दररोजचं पक्षाच्या अधिकृत उमेदवारासाठी जाहीर सभांच्या माध्यमातून वातावरण पालटण्याचा प्रयत्न करीत आहेत. यात भाजपचे पंतप्रधान, केंद्रीय मंत्री यासह विविध राज्यांचे मुख्यमंत्री, मंत्री महोदय आदींचा मोठ्या प्रमाणावर भरणा आहे. त्यामुळे या सर्व अतिमहत्वाच्या नेते मंडळींच्या बंदोबस्तासाठी दररोज कोट्यावधी रुपयांचा चुराडा होत आहे. हा सर्व खर्च शासनाच्या माथी मारण्यात येत आहे. मुळात हे नेतेमंडळी पदावर असले तरी, ते आपआपल्या पक्षाच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी पुणे, पिंपरी चिंचवड आणि जिल्ह्यासह राज्याच्या इतर कानाकोपऱ्यात सरकारी खर्चाने दौरे करीत आहेत. त्यांच्या व्यवस्थेसाठी शासनाच्या अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांना राजशिष्टाचाराचे पालन करावे लागते. अधिकारी, कर्मचारीवर्ग



या कामात गुंतल्यामुळे जनतेची कामे राहून जातात. हा सर्व प्रकार चुकीचा आहे. मुळात हे नेते लोकांच्या नव्हे तर, पक्षाच्या प्रचारासाठी आणि सभेला हजेरी लावण्यासाठी येत असतात. याचा खर्च त्यांच्या पक्षाने केला पाहिजे. त्यांना सभेसाठी शासकीय अधिकारी, पोलीस संरक्षण कशाला हवे?. त्यांच्या विमानाचा, राहण्याचा खर्च सरकारी पैशातून का करायचा? सगळ्या सोयीसुविधा त्यांना का द्यायच्या? मग असं असेल तर, निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवाराला या सर्व सुविधा द्यायलाच पाहिजेत.

दुसरीकडे सत्ताधारी भाजप नाकाने वांदे सोलतय. आम्ही भ्रष्टाचार करीत नाही. लाल दिव्याची गाडी नको. मग हा सगळा खर्च त्यांनी पक्षाच्या अथवा स्वतःच्या खिशातून करावा. सरकारी तिजोरीवर यांचा भार का? सत्ताधारी भाजप निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या प्रचारासाठी लोकांना आणि सरकारी यंत्रणांना का वेठीस धरत आहे. दुसरीकडे आम्ही गेलो तर लाडकी बहीण योजना बंद होईल, अशी वल्गना निवडणूक लढविणाऱ्या मुख्यमंत्र्यांकडून केली जात आहे. अशा जाहिराती निवडणूक आयोगाने प्रथम बंद कराव्यात. मुख्यमंत्री त्यातून जनतेला प्रलोभने दाखवतात. इथे राज्याच्या मुख्यमंत्र्यांसह सर्वच मंत्रीमंडळ निवडणूक लढवत आहे. सर्वच पक्षाचे उमेदवार आणि प्रतिनिधी आहेत. निवडणूक आयोगाला हे दिसत नाही का? धृतराष्ट्राच्या

> ”सत्तेतील लोकांकडून जनतेच्या पैशांचा राजकीय कारणासाठीचा वापर थांबला पाहिजे. त्यासाठी निवडणूक आयोग दक्ष असावा. देशाचे पंतप्रधान, मुख्यमंत्री आणि घटनात्मक पदावरील इतरांनी पक्षाच्या प्रचारासाठी शासकीय सवलतींचा वापर करू नये. त्यासाठी कडक कायदा करणे गरजेचे वाटते. सर्वोच्च न्यायलयाने देखील या प्रकारात थेट हस्तक्षेप करून जनतेच्या पैशांची होणारी लुट थांबवावी.”
>
> - मा. संतोष सौंदणकर, शहर संघटक – शिवसेना चिंचवड विधानसभा...

# जनतेकडून मिळणारा प्रचंड प्रतिसाद पाहून विरोधकांकडून 'रडीचा डाव' : सुनिल शेळके

## विरोधक खोट्या तक्रारी करीत असल्याचा आमदार शेळके यांचा आरोप

**पिंपरी | प्रतिनिधी**

आपल्या प्रचार दौऱ्यात प्रत्येक गावात मतदारांकडून मिळत असलेल्या प्रचंड प्रतिसादामुळे विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकली असून त्यांनी खोट्या तक्रारी दाखल करण्यास सुरुवात केली आहे, या शब्दांत सुनीलआण्णा शेळके यांनी विरोधकांच्या तक्रारीला निकाली काढले.



आमदार शेळके यांनी जाहीर प्रचाराची वेळ संपल्यानंतरही मंगळवारी आढले खुर्द व चांदखेड येथे रात्री प्रचार केल्याची तक्रार विरोधकांकडून शिरगाव पोलीस ठाण्यात नोंदवण्यात आली आहे. त्याबाबत आमदार शेळके यांनी पहिली प्रतिक्रिया देत विरोधकांवर प्रतिहल्ला चढवला.

शेळके म्हणाले की, गेल्या पाच वर्षात केलेली विकासकामे व नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी केलेले प्रयत्न यामुळे प्रत्येक गावात मतदारांकडून मला भरभरून प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे विरोधकांचे धाबे दणाणले आहे. समोर पराभव दिसू लागल्यामुळे जनतेच्या दरबारात लढण्याऐवजी त्यांनी पोलीस स्टेशनची पायरी चढली आहे. यावरून त्यांचे मनोधैर्य पूर्णपणे खचल्याचे दिसून येते.

जनता मला भेटायला आतुर आहे उत्सुक आहे. माझ्या येण्याची वाट पाहत लोक तासनतास थांबतात. मी पोचल्यानंतर माझ्याशी संवाद साधतात. उमेदवार म्हणून मी निवडणुकीचे सर्व नियम पाळत आहे. विरोधकांनी तांत्रिक मुद्दे उपस्थित करून तसेच खोटेनाटे आरोप करून जनतेची दिशाभूल करू नये, असे आवाहन आमदार शेळके यांनी केले.

विरोधकांच्या असल्या खेळीला मी फारसे महत्त्व देत नाही. मावळची जनता येत्या 20 तारखेला विरोधकांना त्यांची जागा दाखवून दिल्याशिवाय राहणार नाही,असे ते म्हणाले.



# चिंचवड विधानसभेत वातावरण पूर्णपणे फिरलंय!

## चिंचवड विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे अधिकृत उमेदवार शंकर जगताप यांची प्रचारात मुसंडी

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिंचवड विधानसभा मतदारसंघातील भाजप शिवसेना राष्ट्रवादी आरपीआय व मित्रपक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार शंकर जगताप यांनी नवी सांगवीमध्ये झालेल्या भव्य प्रचार रॅलीदरम्यान परिवारजनांशी संवाद साधला, आणि त्यांचे विजयासाठी आशीर्वाद घेतले. चिंचवड विधानसभा मतदार संघातील बंधू - भगिनी आणि सर्व सामान्य जनता ही कायम माझ्या हृदयात आहे. आणि त्यांचे स्थान कायम तसेच राहील. त्यांच्या या विश्वासामुळेच लढण्याची ताकत मला मिळाली आहे. त्यांनी प्रेमाने आणि उत्साहाने माझे स्वागत केले. संपूर्ण चिंचवड विधानसभा मतदार संघात माय - बाप जनतेच्या खंबीरपणे पाठीशी उभा राहून मी सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवणार असल्याचे जगताप यांनी या वेळी सांगितले.

सकाळच्या सत्रात नवी सांगवी येथे निघालेल्या प्रचार रॅलीत एम के चौक, समता नगर, गणेश नगर, कीर्ती नगर, समर्थ नगर, आदर्श नगर मधील चैत्रबन सोसायटी, सरस्वती पार्क या ठिकाणी नागरिकांशी भेटी गाठी घेत मतदारांशी घराघरात जाऊन संवाद साधला. माता- भगिनींकडून त्यांना औक्षण केले जात होते.



> गेल्या 10 वर्षांत दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांनी चिंचवड विधानसभा मतदार संघाच्या विकासासाठी मोठा हातभार लावला होता. शहरातील पाण्याचा प्रश्न. जीवघेण्या ट्रॅफिक समस्येवर तोडगा. शहरातील गावांना 'स्मार्ट सिटी' बनवलं. आमदार फंडातून चिंचवड विधानसभा मतदारसंघातील विविध भागात विकासात्मक कामे केली. तसेच अडीअडचणीत असलेल्या सर्वसामान्यांना मदतीचा हात दिला. विविध आरोग्य शिबिरे घेतली. महिलांच्या सक्षमीकरणाला चालना दिली. तरुणांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध क्रीडास्पर्धा आयोजित केल्या. ज्येष्ठ नागरिक कामे केली. आध्यात्मिक प्रवचनाचे आयोजन केले. विविध धार्मिक सण, उत्सव आयोजित करून सामाजिक एकोपा जपला. त्यांनी जनहितासाठी अनेक विकास कामे केली. तरुणांचा रोजगाराचा प्रश्न मिटवला. या आणि अशा अनेक कामांमुळेच चिंचवड विधानसभा मतदारसंघांमध्ये स्व. लक्ष्मण भाऊ जगताप हे लोकप्रिय ठरले होते.
>
> **- शंकर जगताप, उमेदवार, महायुती.**

या प्रचार रॅलीमध्ये माजी नगरसेवक राजेंद्र राजापुरे, अंबरनाथ कांबळे, बळीराम जाधव, सांगवी - राहटणी मंडल उपाध्यक्ष कविता निखाडे, शीतल आगरखेड, सूर्यकांत गोफणे, बाबुराव शितोळे, सखाराम रेडेकर, प्रशांत कडलक, बाळासाहेब पिल्लेवार, सुरेश तावरे, राजू पाटील, आप्पा पाटील, शामराव पालांडे, संदीप दरेकर, राजू मोरे, सुनील कोकाटे, गणेश बनकर, देविदास शेलार, उमेश झरेकर, सुरेश शिंदे, किशोर शिंदे, शिवशरण टेंगळे, बसवराज हिरेमठ, जयसिंग जाधव, अभय नरवडेकर, अमित घोडसाद, चंद्रकांत बेंडे, संजय मराठे, साई कोंढरे, लालासाहेब ढोरे, शिरीष कवडे, राजू नागणे, ज्ञानेश्वर खैरे, सचिन खराडे, विशाल खैरे, संभाजी भेगडे, गिरीश देवकाते, विक्रम भेगडे, मनीष भापकर, राजेश साळुंखे, पवन साळुंखे, प्रवीण जाधव, अशोक कवडे, अविनाश खुंटे, प्रवीण पाटील, योगेश कदम, ललित म्हसेकर, शैलेश जाधव, मनीष रेडेकर, विकी रेडेकर, विशाल गायकवाड, संतोष पाटील, रामदास पोखरकर, रवींद्र रासने, रविकुमार चौधरी, प्रवीण देवासे, संभाजी ढवळे, श्रीकांत पवार, शंकर ननावरे, गोविंद मुखणे, अमित कानडे, बोरसे सर, योगेश कदम यांच्यासह नवी सांगवीतील ज्येष्ठ नागरिक सामाजिक कार्यकर्ते तसेच महिला वर्ग, युवा वर्ग भाजप शिवसेना राष्ट्रवादी आरपीआय मित्र पक्षातील आजी-माजी पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

उमेदवार जगताप म्हणाले की, माझ्या याच परिवारामुळे चिंचवड विधानसभा मतदार संघात मला आपल्या सर्वांची सेवा करण्याची संधी प्राप्त होईल. लक्ष्मण भाऊ जगताप यांच्या प्रेरणेने चिंचवड विधानसभेतून जास्तीत जास्त मतांनी विजय मिळेल आणि पंतप्रधान नरेंद्रजी मोदी आणि विकासपुरुष मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना साथ देवून महाराष्ट्रात पुन्हा एकदा महायुतीचे सरकार आपल्याला आणायचे आहे, असे उमेदवार जगताप म्हणाले.

---

# आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण मोफत देण्यासाठी मी कटीबद्ध

## महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार राहुल कलाटे यांचे प्रतिपादन

**पिंपरी | प्रतिनिधी**

गोरगरिबांच्या मुलांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण मिळावे म्हणून महापालिकेची एक सीबीएसई बोर्डची अद्यावत शाळा माझ्या संकल्पनेतून वाकडला उभी राहिली आहे. त्याधर्तीवर विधानसभा क्षेत्रात विविध ठीकाणी शैक्षणिक संकुलं उभारुन आंतरराष्ट्रीय दर्जाचे मोफत शिक्षण देण्याची माझी योजना आहे. असे प्रतिपादन महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार राहुल कलाटे यांनी केले.

पुनावळेतील नागरिकांशी संवाद साधताना ते बोलत होते. देशाची भावी उज्वल पिढी सक्षम घडावी, विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास व्हावा, रोजगाराभिमुख शिक्षणातून प्रत्येक मुलाला जगविख्यात आयटी पार्कमध्ये रोजगार उपलब्ध झाला पाहिजे, असे धोरण आवश्यक आहे. साहित्य, कला, क्रीडा या विषयाचे सत्ताधारी नेत्यांना वावडे होते, असे दिसते. पालिकेच्या शैक्षणिक आरक्षित जागेचा वापर करून पिंपळे सौदागर, पिंपळे गुरव, रहाटणी-काळेवाडी, थेरगाव, रावेत-पुनावळे अशा सर्व ठिकाणी ठिकाणी दर्जेदार शाळा उभारण्याचा माझा प्रयत्न राहील.



> मी इथला भूमिपुत्र. माझे मित्र आयटीमध्ये नोकरी करतात, सर्वांशी नियमित संवाद असतो, त्यांना काळजी आहे मुलांच्या शिक्षणाची, स्वतःच्या आरोग्याची. या सगळ्यांवर काहीही काम होत नाहीये. मूलभूत सुविधा ते पुढच्या ५० वर्षांचा विचार करून चिंचवडचा विकास व्हायला पाहिजे. शरद पवारांच्या व्हिजनमुळे चिंचवड वाकड विकासाची पायाभरणी केली. त्याला आता आपल्याला पुढे न्यायचं आहे. चिंचवडच्या सर्व भागांचा एकसारखा विकास व्हायला हवा.
>
> **– राहुल कलाटे, उमेदवार महाविकास आघाडी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष**

मी स्वतः शिक्षण संस्था चालक असल्याने शिक्षण समस्यांची जाण मला आहे. या सर्व समस्या लवकरात लवकर निकालात काढण्याचा माझा प्रयत्न राहील. सामान्य घरातील विद्यार्थ्यांना बदलत्या काळानुसार आवश्यक शिक्षण उपलब्ध करून देण्याचा माझा मानस आहे. पारंपरीक आयटीआय शिवाय एआय म्हणजेच कृत्रिम बुध्दीमता आणि डेटा सायन्सशी संबंधीत कोर्सेस नाममात्र शुल्कात कसे उपलब्ध होतील यासाठी आराखडा तयार करतो आहे. राज्य व केंद्र सरकारच्या मदतीने स्वतंत्र संकुल उभारणीचाही विचार आहे.

# यंदा 150 वर्षे जुन्या रथातून होणार माउलींचा रथोत्सव

## नरसिंह सरस्वती स्वामींनी माउलींना केला होता रथ अर्पण : शिसमची बांधणी असलेला रथ भाविकांना पाहता येणार

**पुणे | प्रतिनिधी**

संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराजांचे जन्मोत्सव सप्त शतकोत्तर वर्ष (750 वे वर्ष) सुरू असून, त्यानिमित्ताने वर्षभरात विविध कार्यक्रमांचे आयोजन आळंदी देवस्थानच्या वतीने करण्यात आले आहे. याच सप्त शतकोत्तर वर्षाचे औचित्य साधून आळंदी देवस्थानने भाविकांसाठी अनोखी पर्वणी उपलब्ध करून दिली असून, भाविकांना यंदा कार्तिक वारी सोहळ्यात माउलींचा रथोत्सव हा वैभवी आणि प्राचीन असलेल्या 150 वर्षे जुना लाकडी रथ पाहता येणार आहे.



तब्बल 23 फूट उंच आणि अंदाजे 1 हजार 200 किलो वजन असलेल्या या रथातून माउलींचा आळंदी शहरातून रथोत्सव पार पडणार आहे. सध्या देवस्थानकडून रथाची डागडुजी व रस्त्यावर चालण्याचा सराव सुरू आहे. यामुळे ज्या रथातून रथोत्सव सुरू करण्यात आला अशा मूळ लाकडी रथातून यंदाचा रथोत्सव पाहण्याचे साक्षीदार भाविक ठरणार आहेत. ही अनोखी पर्वणी असून, याचे स्वागत आळंदीसह राज्यभरातील भाविकांकडून होत असल्याचे दिसून येत आहे.

इ.स. 1873 मध्ये श्रीगुरू नरसिंह सरस्वतीस्वामी महाराज आळंदीला आले. इ.स.1886 ला त्यांनी आळंदीत समाधी घेतली. आपल्या 11 वर्षे आळंदीतील कार्यकाळात त्यांनी माऊलींच्या वैभवात भर टाकण्यात मोठे योगदान दिले. माउलींच्या कार्तिकी उत्सवात रथोत्सव त्यांनी सुरू केला. त्यासाठी सुरेख नक्षीकाम असलेला शिसम लाकडाचा भव्य रथ त्यांनी माऊलींसाठी बनविला. त्यातून पुढील काही दशके रथोत्सव या रथातून सुरू होता. मात्र, तत्कालीन रस्त्यांची अवस्था आणि रथाची भव्यता पाहता पुढे देवस्थानने हजेरी श्रीमारुती मंदिर चौकात भव्य रथ उभारणी मंडप बांधला व त्यात हा रथ अनेक वर्षे ठेवण्यात आला.

अलीकडे काही वर्षांपूर्वी तेथील मंडप पाडून हा रथ आळंदी-वडगाव रस्ता येथील विश्रांत वड या देवस्थानच्या बागेत भाविकांना पाहण्यासाठी संवर्धित करत ठेवण्यात आला होता. देवस्थानचे प्रमुख विश्वस्त ॲड. राजेंद्र उमाप, पालखी सोहळाप्रमुख, विश्वस्त योगी निरंजन नाथ, विश्वस्त डॉ. भावार्थ देखणे या नवनियुक्त विश्वस्त मंडळींनी हा रथ यंदाच्या कार्तिकी वारी सोहळ्यात रथोत्सवासाठी बाहेर काढण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आणि त्याबाबतची तयारीदेखील आता सुरू झालेली आहे. यामुळे लवकरच भाविकांना एक प्राचीन आगळीवेगळी रथोत्सवाची परंपरा पुन्हा एकदा या निमित्ताने पाहायला मिळणार असल्याचे दिसून येत आहे.

आता रथाची डागडुजी अंतिम टप्प्यात असून, सध्या सराव सुरू आहे, अशी माहिती प्रमुख व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर यांनी बोलताना दिली. पालखी सोहळा मालक बाळासाहेब आरफळकर यांनी याबाबत अनेकदा बोलताना हा रथ पुन्हा सुरू करण्याबाबत संकल्प केला होता. हा संकल्प यंदा पूर्ण होत असल्याने त्यांनीदेखील याबाबत आनंद व्यक्त केला आहे.

### रथोत्सवाचे महत्त्व

» कार्तिक वद्य त्रयोदशीला संत श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा समाधी दिन साजरा होत असतो तर त्याच्या पूर्वसंध्येला द्वादशीला माऊलींचा चांदीचा मुखवटा भव्य रथात ठेवून गोपाळपुरा ते श्री माउली मंदिर अशी ग्रामप्रदक्षिणा होत असते, याला रथोत्सव असे म्हणतात. दरवर्षी तो पंढरपूरला नेण्यात येणाऱ्या चांदीच्या रथातून होत असतो. यंदा तो पुरातन लाकडी रथातून होणार आहे.

### रथाची वैशिष्ट्ये

» इसवी सन 1875 ते 1880 च्या दरम्यान हा रथ तयार करण्यात आला. रथाचे संपूर्ण लाकूड हे शिसमचे असून, रथाचे अंदाजे वजन 1 हजार 200 किलो आहे. रथाची उंची 23 फूट असून, लांबी जवळजवळ आठ ते दहा फूट आहे. रथाची चाके ही लोखंडी व लाकडी बांधणीची आहेत.


# ताम्हिणी घाट बनला देशातील विक्रमी पावसाचा प्रदेश

## तब्बल 38 वर्षांचा डेटा दिला, तरीही ताम्हिणी घाटाची दखल नाही : जगासमोर प्रथमच खरी आकडेवारी आणली

**पुणे | प्रतिनिधी**

देशात सर्वाधिक पाऊस मेघालय राज्यातील चेरापुंजी अन् मोसमीराम या गावात पडतो, अशी नोंद सर्वत्र आहे. दरवर्षी जून ते सप्टेंबर या चार महिन्यांत या भागात सरासरी 9 हजार मिलिमीटर पाऊस पडतो. मात्र पुणे अन् रायगड जिल्ह्यांना जोडणारा ताम्हिणी हा घाटदेखील देशाला सर्वाधिक पाऊस देतो. यावर पुण्यातील चार ज्येष्ठ हवामान तज्ज्ञांनी संशोधन करून 'रॉयल मेट्रोलॉजिकल सोसायटी' या जगातील प्रतिष्ठित शोधपत्रिकेत अवघ्या जगाला नवी माहिती दिली आहे. या घाटातील तब्बल 38 वर्षांच्या पर्जन्याची आकडेवारीच बोलकी आहे. मात्र, तरीही ताम्हिणी घाटाच्या विक्रमी पावसाची नोंद देशाने घेतली नाही.

देशात सर्वाधिक पाऊस कुठे पडतो? हा प्रश्न सामान्यज्ञान स्पर्धेत हमखास विचारला जातो. आयएएस किंवा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परिक्षेतही हा प्रश्न परीक्षार्थी पाठ करून जातात. त्याचे छापील उत्तर एकच येते मेघालय राज्यातील चेरापुंजी हे गाव. मात्र, अलिकडच्या काळात त्याच राज्यातील मोसमीराम या गावाने चेरापुंजीलाही मागे टाकत पहिला क्रमांक मिळवल्याची नवी नोंद आहे. मात्र, यंदाच्या 2024 च्या मान्सूनने ताम्हिणी घाटाचे नाव चर्चेत आले. कारण तेथे यंदा जून ते सप्टेंबर या चार महिन्यांत सुमारे 10 हजार मी.मी. च्या जवळपास पाऊस पडला. ताम्हिणी येथे दरवर्षीची सरासरी कमीत कमी 5 ते 6 हजार मी.मी. इतकी आहे, मात्र प्रत्यक्षात तेथे 9 हजार ते 9 हजार 500 मी.मी. पाऊस पडतो. यंदा 2024 मध्ये जून ते सप्टेंबर या काळात येथे तब्बल 9 हजार 800 मी.मी. म्हणजे सुमारे दहा हजार मी.मी.च्या जवळपास पाऊस झाला आहे.



याबाबत पुण्यातील ज्येष्ठ हवामानतज्ज्ञ डॉ. जीवनप्रकाश कुलकर्णी यांनी खूप नवी माहिती दिली. ताम्हिणी घाट आणि चेरापुंजीच्या तब्बल 38 वर्षांच्या आकडेवारीचा अभ्यास केला अन् त्यांनी देशासह जगाला ताम्हिणी घाटच सर्वाधिक पर्जन्याचा प्रदेश असल्याचे शोधनिबंधातून पटवून दिले. मात्र, तरीही ताम्हिणी घाटाची नोंद घेतली जात नाही, अशी खंत शोधनिबंधातच व्यक्त केली आहे.

### काय आहेत ताम्हिणी घाटाच्या पावसाची वैशिष्ट्ये

ताम्हिणीचा मान्सूनचा पाऊस हा वाऱ्याच्या दिशेने असलेल्या स्थानकांपेक्षा जास्त आहे.

सर्वमान्यपणे स्वीकारल्या जाणाऱ्या मताच्या विरुद्ध हे संशोधन आहे. कारण पर्वतांच्या बाजूने पाऊस कमी पडतो, हे खोडून काढले आहे.

अल निनो असो किंवा ला-निना असो दुष्काळातही तेथे एका दिवसात तब्बल 695 मी.मी. पाऊस पडल्याची नोंद आहे. तीन दिवसांचा सरासरी पाऊस 1055 मी.मी. गणला गेलाय.

ताम्हिणीजवळील मुळशी कॅम्प, शिरगाव, दावडी आणि आंबवणे या घाटमाथ्यावरील गावांसह महाबळेश्वर येथील मोसमी पावसाचे प्रमाण जास्त आहे.

ताम्हिणी हे स्टेशन मुळा नदीपात्रातील हवामान शास्त्रीय उपविभाग आहे.

या शास्त्रज्ञांनी अभ्यासासाठी घाटमाथ्यावरील मुळशी- कॅम्प, शिरगाव, दावडी, आंबवणे आणि ताम्हिणी क्षेत्राची निवड केली.

महाराष्ट्रात सर्वाधिक पाऊस महाबळेश्वर येथे पडतो असे मानले जाते. पण, ताम्हिणीचा पाऊस त्याच्या दीड ते पावणेदोन पटीने जास्त आहे.

पुण्यातील या चारही शास्त्रज्ञांनी देशातील इतर दिग्गज हवामान शास्त्रांचे दावे खोडत ताम्हिणीचे महत्त्व पटवून दिले.

### जगासमोर प्रथमच खरी आकडेवारी आणली

» 1975 ते 2013 या कालावधीतील ताम्हिणी (जून ते सप्टेंबर) मधील आकडेवारीत मोठी तफावत दिसून आली. ताम्हिणी अन् चेरापुंजीच्या पर्जन्यमानाच्या आकडेवारीच्या विश्लेषणातून ताम्हिणी घाट देशात नंबर वन आहे, हेच अनेक वेळा दिसून आले. या शोधनिबंधात अनेक शास्त्रीय आलेखांद्वारे हे पटवून दिले आहे. हा शोधनिबंध 2016 मध्ये प्रसिद्ध झाला तरीही अजून ताम्हिणी घाट दुर्लक्षितच आहे.